स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



✻ अभिवादनकर्ते ✻
राष्ट्रीय अपराध जाँच ब्युरो
नवी दिल्ली, शाखा-लातूर

# खबर
## से हकिकत तक़
KHABAR SE HAKIKAT TAK

अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



✻ अभिवादनकर्ते ✻
राष्ट्रीय अपराध जाँच ब्युरो
नवी दिल्ली, शाखा-लातूर

● WEBSITE : https://khabarsehakikattak.in
● Email : shirishkumarsherkhane@gmail.com

संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२

कार्यकारी संपादक : ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष १ ले. | अंक ५१ वा. | सोमवार दि.२७ मे ते ०२ जून २०२४ | RNI No. : MAHMAR/2023/86200 | किंमत २ रूपये | पाने : ४


# समान नागरी कायदा आणणार-नरेंद्र मोदी

## हिमाचल प्रदेश, पंजाब येथे प्रचारसभेत दिला नारा



। नवी दिल्ली: विरोधकांना गरिबीत खितपत पडलेला, संकटांनी वेढलेला, समस्यांनी ग्रस्त असलेला भारत आवडतो. त्यामुळेच त्यांना देशाच्या विकासाच्या गाडीत रिव्हर्स गियर टाकून जुनी परिस्थिती परत आणायची आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. हा मोदी विरोधकांचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही, असेही ते म्हणाले.

पंतप्रधानांनी शुक्रवारी हिमाचल प्रदेश आणि पंजाबमधील प्रचारसभांमधून आपल्या निर्णयांचे समर्थन केले. मी समान नागरी कायदा आणण्याचे वचन दिले आहे. कारण भारताचा नागरिक मग तो हिंदू असो, मुस्लिम असो, शीख असो किंवा बौद्ध असो, सर्वांसाठी समान कायदा असला पाहिजे. परंतु काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधक समान नागरी कायद्याला विरोध करत आहेत. मतपेढीच्या राजकारणासाठी मुस्लिम पर्सनल लॉच्या नावाखाली हे लोक शरिया कायद्याचे समर्थन करतात. काँग्रेसला असा भारत आवडतो, जिथे नागरिक गरिबी, संकट, समस्यांनी वेढलेले असतात. त्यामुळे त्यांना देशात जुनी परिस्थिती परत आणायची आहे. देशाच्या विकासाच्या गाडीत त्यांना रिव्हर्स गियर टाकायचा आहे. यासाठी ते कलम ३७० परत आणू, सीएए रद्द करू, देशाची अण्वस्त्रे संपवू, अशी आश्वासने देत आहेत. परंतु मोदी असेपर्यंत विरोधकांचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही, असे मोदी म्हणाले. (पान २ वर)

# लोकनेते विलासराव देशमुख यांना अभिवादन!



लातूर : माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांची ७९वी जयंती रविवार दि. २६ मे रोजी लातूर जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. बाभळगावच्या विलासबागेत हजारो चाहत्यांनी अभिवादनासाठी गर्दी केली होती.

अभिवादन कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. अमित देशमुख, विलास कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख, सुवर्णाताई देशमुख, सिने अभिनेते रितेश देशमुख, आ. धीरज देशमुख, जेनेलिया देशमुख, दीपशिखा देशमुख, श्रीमती विजया देशमुख, अभिजीत देशमुख, सत्यजीत देशमुख, सारिका देशमुख यांनी विलासराव देशमुख यांच्या समाधीवर पुष्प अर्पण केले. विलासराव देशमुख यांनी ज्या ज्या पदावर काम केले तेथून विकासाला गती आणि लोकांच्या कल्याणाला चालना देण्याचे काम केले. नक्षत्रामध्ये जसे सुर्य उर्जेचा स्त्रोत म्हणून काम करतो तसे राजकारणाच्या नभात विलासराव देशमुख नावाचे वलय आपल्याला कायम प्रेरणा देत राहणार आहे, या भावना मनात घेऊन हजारो कार्यकर्त्यांनी या अभिवादन कार्यक्रमाला हजेरी लावून आपल्या लोकनेत्यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण अभिवादन केले. या प्रसंगी सुप्रसिद्ध सिने पार्श्वगायक गायक मंगेश बोरगावकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी शास्त्रीय संगीताच्या भावस्वरांजली या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुष्पांजली अर्पण केली. या सभेचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सुर्यवंशी यांनी केले. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री संजय बनसोडे, खा. ओमराजे निबाळकर, आ. विक्रम काळे, माजी मंत्री विनायकराव पाटील, आ. मोहनराव हंबर्डे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार धनाजी साठे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, माजी आमदार रवी गायकवाड, शिवसंग्राम संघटनेच्या अध्यक्षा ज्योती मेटे, आबासाहेब पाटील सेलूकर, श्रीशैल उटगे, ॲड.किरण जाधव (पान ४ वर)

# पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्याहस्ते हेडकॉन्स्टेबल राम पव्हरे यांना प्रशस्तीपत्र देवुन सन्मानीत



जालना–जालना बस स्थानकातून ५ वर्षीय मुलीला पळवून नेल्या प्रकरणाचा तपास अवघ्या आठ दिवसात लावल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे हेड कॉन्स्टेबल राम (बबन) पव्हरे यांना जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधिक्षक आयुष नोपणी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांची उपस्थिती होती.

याबाबत अधिक माहिती दिनाक २५/४/२०२४ रोजी पोलीस ठाणे सदर बाजार गु. रं.नं. ४१६ / २०२४ कलम ३६३ भादवी मध्ये जालना बसस्थानकावरून पहाटे २.३० वा. ०५ वर्ष वय असलेल्या मुलीला अज्ञात इसमांनी पळवून नेलेबाबतची फिर्याद दाखल होताच, गुन्हयाचे गांभया लक्षात घेता सदर गुन्हा हा स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. या करिता स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने अहोरात्र ८ दिवस राज्यातील विविध ठिकाणी जाऊन तांत्रिक विश्लेषण, गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढून अत्यंत कौशल्यबुद्धीचा वापर करून गुन्हा उघडकिस आणला व मुलीला शोधण्यात यश आले. तमाशाफडामध्ये विक्री करण्याचा उद्देशाने विक्री पासुन बचाव थांबविण्यापासुन तसेच मुलीला सुखरूप आणण्यात यश आल्याबद्दल आपले व आपल्या संपुर्ण टिमचे जालना पोलीस दालाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे. आपण भविष्यात देखील अशीच उल्लेखनिय कामगिरी करून पोलीस दलाची प्रतिमा उंचावाल अशी मला खात्री आहे. या प्रशंसनिय कामगिरीबद्दल आपणास प्रशस्तीपत्र देऊन आपणांस गौरवण्यात येत आहे.

# भाजपाची डोकेदुखी वाढली ; महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी पक्षाला बसणार फटका

## राजकीय विश्लेषकांच्या तर्क–वितर्कांनी वातावरण ढवळले



पश्चिम बंगाल, ओडिशानंतर आता दक्षिण भारतातील आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये भारतीय जनता पक्षाच्या आशा वाढल्या आहेत. महाराष्ट्रासारख्या काही राज्यांमध्ये जागांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी भाजपने आता उत्तर प्रदेशमध्ये आपली सर्व ताकद पणाला लावली आहे. अब की बार ४०० पारचा नारा देणाऱ्या भाजपला लोकसभा निवडणुकीत काही राज्यांमध्ये फटका बसत आहे. काही राज्यांमध्ये जागा कमी होणार असल्याचे अहवाल आल्याने भाजपमध्ये अस्वस्थता आहे. ३७० जागा येतील की ३०० पेक्षा कमी जागा येतील ? स्पष्ट बहुमतासाठी आवश्यक असणारा जादुई आकडा २७२ पर्यंत जाईल की, २५० पर्यंतच जागा जिंकता येतील या प्रश्नांनी भाजप नेत्यांना छळले आहे.

पश्चिम बंगाल आणि ओडिशामध्ये किती जागा वाढणार हे निश्चित आहे. मात्र आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधून भाजपासाठी आनंदाची बातमी आली आहे. आंध्र प्रदेशात भाजपचा नवा सहकारी तेलुगू देसम पक्ष चांगली कामगिरी करत आहे आणि भाजपलाही त्याच्याशी युती केल्याचा फायदा होत आहे. आंध्रमध्ये भाजप दोन ते तीन जागा जिंकू शकतो, असा अंदाज आहे.

**महाराष्ट्रामध्ये जागा कमी होणार?**

२०१९ च्या तुलनेत भाजपला यावेळी २०२४ मध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, हरियाणा, राजस्थानमध्ये कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. ज्या राज्यांमध्ये भाजपच्या जागा वाढू शकतात, त्यामध्ये पश्चिम बंगाल, ओडिशा, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**तेलंगणात किती जागा वाढणार?**

तेलंगणातून भाजपसाठी निवडणूक सर्वेक्षण करणारे नेते जीव्हीएल नरसिंह राव यांनी दावा केला आहे की, तेलंगणात भाजपच्या जागा चारवरून वाढत ८ ते १० होऊ शकतात. राव हे भाजपचे राज्यसभा खासदार आहेत. आंध्र प्रदेशात टीडीपी १५ जागा जिंकू शकते असा त्यांचा दावा आहे.

## उत्तरप्रदेशावर विशेष लक्ष केंद्रित

**आता शेवटच्या टप्प्यातील मतदानासाठी भाजपने उत्तर प्रदेशात आपली सर्व ताकद पणाला लावली आहे. नरेंद्र मोदी स्वत: वाराणसीत तळ ठोकून उत्तर प्रदेशातील १३ लोकसभा जागांवर आपले लक्ष केंद्रित करणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या आधीच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उत्तर प्रदेशात पोहोचत असून, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना हिमाचल प्रदेश आणि पंजाबवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आहे. पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आता मतदानाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत उत्तर प्रदेशातच राहणार आहेत.**

# धार्मिकता जपत बाबांनी दिला माणुसकीचा संदेश

## बेवारस मृतदेहाची हिंदू पद्धतीने अंत्यविधी; गांधी चौक पोलीस स्टेशन विभागाचे सहकार्य



लातूर(प्रतिनिधी): लातूर येथील अण्णाभाऊ साठे चौक परिसरातील एका रस्त्याच्या कडेला पडलेला अनोळखी व्यक्तीस शासकीय रुग्णालयात औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचार चालू असताना दिनांक ०३–०५– २०२४ रोजी मरण पावला. त्याचे दि. ०४–०५–२०२४ रोजी पोस्टमार्टम करण्यात आले. सदर मृतदेह अनोळखी असल्याने शासकीय रुग्णालयाच्या शीतगृहात ठेवण्यात आले.

त्यानंतर त्याची अध्यापही ओळख न पटल्याने त्यास एका जन्नतुल् बकी सेवाभावी संस्थश्र लातूर, मार्फत प्रेतावर अंत्यविधी करण्यात आले. या कामी जन्नतुल बकी सेवाभावी संस्था लातूर यांचे संस्थापक अध्यक्ष महंमद अली उर्फ बाबा करीम साहब शेख यांनी माणुसकी हाच आपला धर्म आहे असे समजून तो मयत हिंदू धर्मीय असल्याने त्याचे दि.०८–०५–२०२४ रोजी अंतिम संस्कार हिंदू धर्मीय पद्धतीने करण्यात आले.

या कामी बाबांचे सहकारी सामाजिक कार्यकर्ते वहीदोदिन शेख, हमीदभाई शेख, अल्ताफ काझी, इब्राहिम शेख, इस्माईल शेख, उमर शेख, मेहबूब शेख, ट्राफिक आंबेसेडर तथा एनसीआयबी अधिकारी शिरीषकुमार शेरखाने या सर्वांनी सामाजिक बांधिलकी समजून सामाजिक कार्य पार पाडले.

बाबांचे हे सामाजिक कार्य अविरतपणे अखंड चालूच आहे. बाबा हे गंजगोलाई भागात एका रस्त्याच्या कडेला फ्रुटचा गाडा चालवतात. त्याच्यावरच बाबांचा उदरनिर्वाह चालत असतो.

मोहम्मद अली उर्फ बाबा हे नेहमीच निस्वार्थ भावनेने कोणतेही शुल्क न घेता स्वतः रोजंदारीच्या कमाई मधून पदर मोड करत असतात.

खरे पाहता हे सामाजिक कार्य असून ते एकट्याचे नाही, हे समाजातील नागरिकांनी समजून घेतले पाहिजे. तसेच दानशूर व्यक्तीने पुढे येऊन पुढाकार घेऊन सर्वांनी हातभार लावणे गरजेचे आहे, असे सर्व स्तरातील नागरिकांतून व्यक्त केले जात आहे. बाबांचे कार्य महान आहेच. यातून सर्वांनी बोध घ्यावा आणि बाबांना साथ द्यावी, असे नागरिकांतून बोलले जाते.




**लातूरचे माजी नगराध्यक्ष, प्रसिद्ध ज्येष्ठविधीज्ञ, सामाजिक प्रश्नांची जाण असणारे आणि योग्य मार्गदर्शन करणारे, ॲड.व्यंकटराव बेद्रे यांच्या वाढदिवसानिमित्त खबर से हकीकत तक वृत्तपत्र परिवार आणि राष्ट्रीय अपराध जाँच ब्युरो नवी दिल्ली, शाखा लातूरचे अधिकारी शिरीषकुमार शेरखाने यांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.**

## उन्हाचा पारा चढला!

नवी दिल्ली/ मुंबई : देशातील तापमानात सातत्याने बदल होत असून कुठे उन्हाचा कहर आहे तर कुठे अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. देशातील बहुतांश भागात सरासरी तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे.सध्या उत्तर भारत अग्रस्थानी असून देशभरात उष्णतेची लाट आली आहे.

# अमेरिकेत शिक्षण क्षेत्रात बीडच्या सुपुत्राचा डंका, फुलचंद दत्तात्रय गुट्टे यांनी मिळवली डबल मास्टरकी,

## दादाहारी वडगाव परदेशात चमकले



अंबाजोगाई(प्रतिनिधी)– गुणवत्तेचा सुगंध लेकराच्या जन्मत: अंगी असेल तर जिद्दीने त्याला शिक्षण क्षेत्रात यश मिळाल्याशिवाय रहात नाही. कठोर परिक्रमाची तपश्चर्या स्वत्वाच्या अस्तित्वाला मजबुत करून सोडवु शकते. वाचकांचा विश्वास बसणार नाही पण हे खरं आहे की दादाहारी वडगाव ता.परळी येथील वीज कामगार नेते दत्तात्रय गुट्टे यांचे सुपुत्र फुलचंद गुट्टे यांनी गुणवत्तेचा सुगंध अमेरिकेत दरवळताना लावलेला अटकेपार झेंडा माता–पित्यांची कॉलर टाईट करणारा ठरला. करोनाच्या काळात नौकरी करत फुलचंदनं हरिशबर्ग विद्यापीठात व्यक्तिगत प्रकल्प व्यवस्थापन विषयात एम.एस.पदवी मिळवली. दरम्यानच्या काळात पदवीदान कार्यक्रमाला आई–वडिलांनी येता आले नाही म्हणून पुन्हा त्याने दुसर्या विषयात मास्टर डिग्री घेवुन प्रमाणपत्र घेण्यासाठी आई–वडिलांना बोलावुन घेतले अर्थात माता–पित्यांच्या साक्षीने अमेरिकेत बीड जिल्ह्याच्या सुपुत्राने शिक्षण क्षेत्रात वाजवलेला डंका जिल्ह्याच्या दृष्टीने भुषणावह गोष्ट म्हणावी लागेल.

बापाच्या लाडाने चंगळवादाच्या भोगात लेकरं जेव्हा बुडुन निघतात तेव्हा खर्या अर्थाने पुण्याच्या कल्याणी नगर सारख्या आग्रवाल पिता–पुत्राचे जीव घेणे प्रकार पुढे येतात. पण आपल्या लेकरावर जन्मदात्याचं असलेले नियंत्रण खर्या अर्थाने गुणवत्तेत पुढे जाण्यासाठी लाभदायी निश्चित (पान २ वर)

## संपादकीय....

# नंदनवन फुलवूया...!

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्याच्या अंगाखांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरू आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतं आज हाच माणूस आपल्या उपकारकर्त्यावर उलटला आहे. मनमोही पावसाने निसर्गासारखेच माझ्या अंतर्मनाला मोहविले आहे. झिमझिमणार्या पावसात सृष्टीचे सुजलाम् सुफलाम् रूप न्याहाळताना नकळत तुकाराम महाराजांचे भावमधुर काव्य आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सुरेल स्वरांचा साज लाभलेले कर्णमधुर गीताने कान टवकारले –

**‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।**
**पक्षीही सुस्वरे आळवीती ।।**

वृक्ष आणि वेली निसर्गाचे सर्वोत्तम वरदान. संथपणे एका लयीत बरसणार्या पावसाच्या सरींनी बहरलेल्या सृजनशील निसर्गाच्या सान्निध्यात सृष्टीचा दृक्श्राव्य अनुभव घेता यावा, यासारखे भाग्य ते कोणते? मनातील आठवणींची पिसे भिरभिरू लागली. धरणीमातेने मुक्त हस्ते बहाल केलेला मौल्यवान खजिना म्हणजे वृक्ष आणि वेली. ‘परोपकाराय फलन्ति वृक्षाः’ या शब्दात वृक्षांचा गौरव केलेला आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील स्नेहसंबंध फार पुरातन कालापासून आहे. अगदी अनादी कालापासून निसर्ग मानवाचा मित्र आहे. वृक्ष ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. अलीकडे पर्यावरण प्रदूषणाविषयी बरेच काही वर्तमानपत्रातून वाचायला मिळते. प्रदूषणाचे दुष्परिणाम आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवू लागले आहेत. आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्याच पृथ्वीचा, मानवाने सुरू केलेल्या जंगलतोडीमुळे पृथ्वीचा समतोल बिघडत चाललेला आहे.

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्याच्या अंगाखांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरू आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतं आज हाच माणूस आपल्या उपकारकर्त्यावर उलटला आहे. माणसाने निसर्गाला विद्रूप करायचा जणू चंगच बांधला आहे. एकेकाळी वैभवशाली असलेल्या निसर्गाला अवकळा येत चालली आहे. मानवी मन हे निसर्गदत्त आहे. आजच्या या यंत्रयुगीन युगात तो यंत्रांच्या जंजाळात जेवढा अधिक अडकतो तेवढेच त्याचे मन निसर्गाकडे खेचले जाते. म्हणून तर डेरेदार वृक्षाच्या सान्निध्यात त्याचे मन सुखावते. निसर्गाच्या ओढीने मन त्याचे आसुसते. आज प्रमाणाबाहेर जंगलतोड होत आहे. प्रदूषण, अवर्षण, जमीनीची धूप या संकटांना आपणच आमंत्रण देत आहोत. निसर्गाचे संतुलन बिघडण्यास कोण जबाबदार याचा सखोल विचार होत आहे का? दिसेल त्या झाडावर घाव घालायचे आणि मिळणार्या जागेत घरे, कारखाने उभारायचे हे काम माणसांनीच सुरू केले. पैसा कमावणे हे आजच्या युगाचे एकमात्र ध्येय झाले आहे. पैशाच्या मागे लागत असताना आपण ज्या झाडाच्या आश्रयाला आहोत त्याच झाडावर आघात करून आपला सर्वनाश करून घेत आहोत, हे माणसाच्या लक्षात येत असेल पण मनातला लोभ त्याला स्वस्थ बसू देत नाही. सुंदर निसर्गाला आता विनाशाची घरघर तर लागणार नाही ना? मनात शंकेचे काहूर निर्माण होते. असे असेल तर लोभी माणूसच निसर्गाच्या घरघरीला कारणीभूत आहे.

यंदा उन्हाळ्यात तापमान पंचेचाळीशी ओलांडण्याच्या मार्गावर झुकू लागले. पाऊस वेळेवर पडत नाही. वैश्विक तापमानाची समस्या भेडसावत आहे. हिमशिखरे वितळत आहेत. समुद्राच्या पातळीत वाढ होत आहे. वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे. नाहीतर एकेकाळच्या जंगलांच्या ठिकाणी आगामी काही वर्षांनी वाळवंटे बनतील. जमिनीसाठी, सत्तेसाठी नव्हे तर पाण्यासाठी माणसा–माणसांत युद्धे होतील. आज जिथे तिथे इमारतींची जंगले दिसत आहेत. सिमेंटच्या जंगलात मुक्त निसर्गसौंदर्याचा शोध घेणे म्हणजे जणू वाळवंटात हिरवळ शोधणे! आजचा माणूस खूप कर्तृत्वशाली पराक्रमी आहे. निसर्गाला लागणारी घरघर फक्त मानवच थांबवू शकतो. हे अशक्य नाही. माणसाने या बाबतीत आता अंतर्मुख होण्याची वेळ आली आहे. एका बाजूला ‘झाडे लावा, झाडे वाचवा’चे नारे पिटतात आणि दुसरीकडे माणसंच झाडांवर आघात करतात. झाडांना आपण ‘सोयरे, वनचरे’ मानतो ना? मग त्याची काळजी घेणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. झाडे स्वतःसाठी नव्हे तर भावी पिढ्यांच्या सुखासाठी, समृद्धीचे जीवन देण्यासाठी झाडांना संरक्षणाचे दान तरी द्यावे. पशूपक्षी, प्राणी, वन यांचं संरक्षण, संवर्धन करून आपल्याच बांधवांना वाचवायचे. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे. रोपं लावण्याबरोबर ती कशी जगतील याचीही खबरदारी घेतली पाहिजे. संगोपन केले पाहिजे. नाहीतर वनमहोत्सव साजरे करायचे. मोठमोठ्या मंत्र्यांना, आमदारांना आमंत्रित करायचे. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करायचं. ‘झाडे लावा, झाडे जगवा, भूमी तगवा’, घोषवाक्यांचा पुकारा करायचा. वर्तमानपत्रात ठळक बातम्यांसह छायाचित्रं प्रसिद्ध करायची आणि पुढच्या वर्षी ‘जैसे थे’ स्थिती. याला काय अर्थ आहे?

भविष्यात वृक्ष टिकले नाहीत तर आपणही टिकणार नाही. मुलांप्रमाणे झाडांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. निसर्गाबरोबर राहण्यासाठी वृक्षलागवड ही सुवर्णसंधी आहे. वृक्ष माणसाचे जीवन फुलांनी सुगंधित करून फळांनी रसभरित करतात. पण मानव वृक्षतोड करून आपल्याच पायावर कुर्हाड मारून घेतो. त्यामुळे वृक्षारोपण ही नितांत गरज ठरली आहे. आपले जीवन आनंदमय, चैतन्यमय होण्यासाठी झाडं वाचवा. असे प्रयत्न केले तर पदराआड दिवा जपल्याप्रमाणे सृष्टी आपल्यावर मायेचे छत्र सदैव ठेवील. आम्हा सर्वांवर तिची असीम कृपादृष्टी राहील. निसर्ग आपल्याला शिकवतो. पण आपण समजून घेत नाही. निसर्गाशी मैत्री करणेच हितावह आहे. निसर्गाची ताकद अफाट आहे. निसर्गाशी शत्रुत्व केले तर तो त्याची ताकद दाखवतो. कुठंतरी त्सुनामी येते. भुकंप होतात व सर्व उध्वस्त होतं. होत्याचं नव्हतं होतं. ‘निसर्ग कोपला’ असं म्हणण्यापेक्षा याला आपण किती कारणीभूत आहोत याचा प्रामुख्याने अंतर्मुख होऊन विचार करणे शहाणपणाचे ठरेल. खरोखरच आज अशी वेळ आली आहे की माणसाने आत्मपरीक्षण करणे अनिवार्य आहे. आपण सगळे.

**झाडे लावू पाणी घालू। वृक्षसंवर्धन करू।।**
**निसर्ग रंगात मिसळू। पर्यावरण समतोल साधू।**
**वृक्षवल्लींना साथ देऊ। हरितक्रांतीचे गीत गाऊ।।**
**निसर्गात नंदनवन फुलवू। जगण्याचा आनंद मिळवू।।**

# लातूर जिल्ह्यात पहिल्यांदा स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निकमध्ये एआय कोर्सला मान्यता

## दिशादर्शक शाखेची भर : प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, आजच प्रवेश निश्चित करा

लातूर : जेएसपीएम संचलित स्वामी विवेकांनद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक हे महाविद्यालय तंत्रशिक्षणामध्ये अग्रणी महाविद्यालय म्हणून नावाजलेले आहे. २०१३ मध्ये स्थापन झालेल्या या महाविद्यालयाने उत्कृष्ठ अद्यापन, उत्तम दर्जाचे औद्योगिक प्रशिक्षण व शिक्षणाच्या माध्यमातून विविध कंपन्यामध्ये प्लेसमेंटची संधी मिळवून देण्याचे काम मोठ्या प्रमाणात केलेले आहे. या कॉलेजमध्ये सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनियरींग या पाच शाखेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केलेले आहे. आता या महाविद्यालयाच्या दैदिप्यमान प्रगतीमुळे २०२४–२५ मध्ये आर्टीफिशियल इंटिलिजियन्स अँड मशिन लर्निंग(एआय) या नवीन शाखेला मान्यता मिळाली असून राज्याच्या, देशाच्या व जगाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण असणार्या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एआय मध्ये करीयर करण्याची संधी जेएसपीएम संस्थेने मिळवून दिलेली आहे. त्यामुळे एआय शाखेला प्रवेश घेणार्या विद्यार्थ्यांसाठी ही संधी मोलाची आणि दिशादर्शक ठरणारी आहे.

जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून पुणे, औरंगाबाद, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, रेणापूर अशा विविध ठिकाणी ३७ युनिट व १५०० कर्मचारी व १५००० विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अध्यापन व अध्ययनाचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. त्यामध्ये आणखी नवीन शाखेची भर पडली असून २०२४–२५ या शैक्षणिक वर्षामध्ये आर्टीफिशियल इंटिलिजियन्स अँड मशिन लर्निंग(एआय) या माध्यमातून विद्यार्थ्यांना करीयरची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या तंत्रज्ञानामुळे जगात उद्योग, व्यापार, वैद्यकीय शिक्षण , कृषी, बँकींग अशा सर्व क्षेत्रात क्रांतीकारक बदल अत्यंत गतीने घडणार आहेत. या संदर्भात भारतात याचा वापर अधिक व्हावा म्हणून देशाचे व्हिजनरी पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी जागतिक उद्योजक मा.बिल गेट्स यांच्याबरोबर हा उद्योग भारतात सुरुवात करण्याचे निमंत्रण दिलेले आहे. त्यामुळे एआय हा फक्त शब्द नसून बदल आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे जगाचे रूप बदलणार आहे. अशी प्रतिक्रिया जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांनी व्यक्त केली आहे.

सध्या या तंत्रज्ञानाच्या वापराने प्रत्येक क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. दिवसागणीक विविध क्षेत्रातील अनेक गोष्टींच्या विकासामध्ये आर्टीफिशियल इंटिलिजियन अँड मशिन लर्निंग(कृत्रिम बुध्दिमत्ता) याचा मोलाचा वाटा आहे. एआय ही जगभरातील प्रसिध्द टेक्नॉलॉजी आहे. या माध्यमातून बुध्दिमत्तेसारखे शिकण्याची क्षमता मशीनमध्ये आणि त्या मशीनमधल्या सॉफ्टवेअर, प्रोग्राम्समध्ये तयार करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान आहे. याचा वापर आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रीम बुध्दिमत्तेच्या आधारावर केला जाणार आहे. यामुळे भविष्यामध्ये अनेक कामांची जागा मशीन घेणार आहेत.

**एआयच्या प्रवेशासाठी आजच संपर्क साधा**

जेएसपीएम संचलित आर्टिफिशियल इंटिलिजीयन्स मशीन लर्निंगच्या माध्यमातून इयत्ता १० वी उत्तीर्ण आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांला स्कॉलरशीपच्या माध्यमातून प्रवेश दिला जाणार आहे तर खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याला ५० टक्के फिसमध्ये सवलत देऊन तीन वर्षाच्या डिप्लोमा कोर्सला प्रवेश दिला जाणा आहे. त्यामुळे मार्यादित प्रवेश असणार्या स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक अंतर्गत(एआय) साठी आजच आपला प्रवेश निश्चित करावा व याबाबतच्या अधिक माहितीसाठी प्राचार्य अभय वावरे यांच्या ९८९०४६१६५४ व उपप्राचार्य दयानंद हासबे यांच्या ९१५६७८३००९ या मोबाईलवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

एआय चे क्षेत्र दिवसेंदिवस अधिक प्रगत होऊन वेगाने वाढत आहे. म्हणूनच पॉलिटेक्निकच्या माध्यमातून करीअर करणार्या विद्यार्थ्यांसाठी एआय हा कोर्स दिशादर्शक ठरणार आहे. त्यामुळे एआय मध्ये करीयर करण्याची इच्छा असणार्या विद्यार्थ्यांनी जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक कॉलेज एमआयडीसी कळंब रोड, लातूर येथे संपर्क साधून आजच आपला प्रवेश निश्चित करावा असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक विनोद जाधव यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने राखली उज्वल यशाची परंपरा

## महाविद्यालयातील ८७१ पैकी ७६३ विद्यार्थी उत्तीर्ण, विज्ञान शाखेचा निकाल ९२.८५ टक्के, वाणिज्य शाखेचा ९०.२६ टक्के, कला शाखेचा ७० टक्के आणि व्यवसाय अभ्यासक्रमाचा ८०.५९ टक्के निकाल



लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. या सर्व गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा स्मृति चिन्ह पुष्पहार आणि पेढे देवून संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर आणि कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. वनिता पाटील, प्रा. नितीन वाणी, कला शाखेचे समन्वयक प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. कल्पना गिराम, डॉ. घनश्याम ताडेवार, व्होकेशनल शाखेचे समन्वयक प्रा. व्यंकट दुडीले आणि स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावर्षी विज्ञान शाखेत एकूण ४३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली त्यापैकी ४०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाखेचा निकाल ९२.८५ टक्के आहे. या शाखेतून कु. शिंदे शुभांगी बालाजी ८६.८३ टक्के घेऊन महाविद्यालयात सर्वप्रथम, कु. पांचाळ सायली बालाजी ८५.८३ टक्के द्वितीय आणि राजगीरवाड कृष्णा शिवाजी ८२.८३ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे. १५ विद्यार्थी ७५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले असून ६८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहे. वाणिज्य शाखेत २६७ परीक्षार्थीपैकी २४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९०.२६ टक्के आहे. या शाखेत २६७ परीक्षार्थी पैकी २४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाखेचा निकाल ९०.२६ टक्के आहे. मागील वर्षीच्या तुलनेत ५ टक्के अधिक आहे. कु. बैले ज्ञानेश्वरी केशवराव ९०.३३ टक्के गुण प्राप्त करून सर्वप्रथम, पांचाळ प्रणव गोपीनाथ ८५.१७ टक्के गुण प्राप्त करून सर्व द्वितीय आणि बादाडे अतुल तानाजी ८४.५० टक्के गुण प्राप्त करून सर्व तृतीय आला आहे.

कला शाखेत १७० परीक्षार्थीपैकी ११९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७० टक्के आहे. कला शाखेत परीक्षेला बसलेल्या १७० विद्यार्थ्यांपैकी ११९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी ७५ टक्के गुण घेणारे ०७ विद्यार्थी, ६० टक्के गुण घेणारे २१ विद्यार्थी आहेत. कु. शिंदे रूपाली प्रवीण ८७.५० टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, कु. बनसोडे श्रेया नागसेन ७८.३३ टक्के गुण प्राप्त करून सर्व द्वितीय आणि ७६.८३ टक्के गुण प्राप्त करून तृतीय आली आहे. एच. एस. सी. व्होकेशनल शाखेत ६७ पैकी ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाखेचा निकाल ८०.५९ टक्के आहे. या शाखेतून सय्यद हुजॅफा हसन ७३.५० टक्के गुण घेऊन प्रथम, बुधावळे जगदीश संजय ७१.५० टक्के गुण घेऊन द्वितीय आणि ढोबळे अनिकेत लालाजी ६८.८३ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

या महाविद्यालयामधून कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून १०० पैकी १०० गुण घेणारे पाली विषयाचे ०४, दुग्धशास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण घेणारा ०१, हिंदी विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०५ विद्यार्थी, भौतिकशास्त्र विषयात ८५ पेक्षा जास्त गुण घेणारे ०२, अर्थशास्त्र विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०२, भूगोल विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०२ विद्यार्थी आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी केले. मनोगतपर मार्गदर्शन संस्थेचे कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांच्या वचनाला अनुसरून देशीकेंद्र महाराजांनी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. आज अनुभव मंडपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातून गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी निर्माण होत आहे याचा मनस्वी आनंद झाला आहे. या कार्यक्रमांमध्ये गुणवंत विद्यार्थी आणि पालकांनी आपली मनोगते व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घनश्याम ताडेवार यांनी केले तर आभार डॉ. अश्विनी रोडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रमातील गुणवंत विद्यार्थी पालकांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचा एच.एस.सी.बोर्ड परीक्षा २०२३–२४ चा निकाल



लातूर : येथील सरस्वती कॉलनी भागातील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९१.२२% व कला शाखेचा निकाल ७७. १४% लागला असून विज्ञान विभागात प्रथमः– मिटकरी सुमित अंगद ७६.१७% द्वितीयः–निकम वेदांगी आनंदराव ७२.३३% व तृतीयः–मलवाडे श्रुती मोहन ७२.१७% व पाटील नंदिनी विनय ७२. १७% गुण घेऊन यशस्वी झालेले आहेत.

तसेच कला शाखेतून प्रथमः–कांबळे अरविंद तुकाराम ७२.३३% द्वितीय मगर पौर्णिमा हनुमंत ६७.५०% व तृतीय जोशी मिहीर मुकुंदराव ६५.६७% व गवळी प्रीती संभाजी ६५.६७% गुण घेऊन यशस्वी झालेले आहेत. विज्ञान विभागात १ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह व २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेत ८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ लातूर. संस्थेचे अध्यक्ष –डॉ. श्री. नरेंद्र रामराव पाटील, व्यवस्थापकीय संचालक–प्रा. श्री शेषराव रावसाहेब मोहिते पाटील (सिंगनाळकर), उपाध्यक्ष–डॉ. श्री. उदय शेषराव मोहिते पाटील, सचिव–श्री. अजय रामचंद्रजी जाधव, उपसचिव–सौ राजश्री नरेंद्र पाटील, कोषाध्यक्ष–श्री. बालाजी दिगंबर पौळ, उपकोषाध्यक्ष–डॉ. सौ. वैशाली उदय मोहिते पाटील, संचालक– श्री वसंत भीमराव पाटील, संचालक– सौ. मेघा अजय जाधव, संचालक– श्री संजय राज प्रमोद हलगरकर, संचालक– कु. श्रुती नरेंद्र पाटील, प्राचार्य– श्री. बावगे एस. एम. उपप्राचार्य– श्री. कटके आर. एम , प्रा. श्री. लिंबाळकर एन. व्ही. (विज्ञान विभाग प्रमुख) , प्रा. सौ. पाटील जे . व्ही , प्रा. कोथिंबिरे एस. बी, प्रा. श्री. जमादार एस.डी , प्रा. सौ. जाधव के. व्ही, प्रा. पाटील एस. एस. कु. शेख टी. टी, प्रा. कांबळे एस. एस, श्री गडगिळे आर. एस, श्री. वंजारे ए. टी व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# एकही खाजगी शिकवणी वर्ग न करता मिळविले ९३.५० टक्के



लातूर : खरोखरच कोणीतरी म्हटले आहे की शिक्षणाची गोडी असणारा विद्यार्थी असो वा विद्यार्थीनी जर त्याने ठरवले की आपल्याला हे ध्येय गाठायचे आहे तर ते ध्येय गाठण्यासाठी तो विद्यार्थीनी प्रयत्नांची पराकाष्टा केल्याशिवाय राहत नाही. अशाच प्रकारचे यश इयत्ता बारावीमध्ये शिकत असलेल्या नम्रताने गाठले आहे. आपल्या प्रचंड मेहनतीच्या जोरावर परिस्थितीबद्दल कसलीही तक्रार न करता प्रचंड इच्छाशक्ती, जिद्द आणि अभ्यासाचे योग्य नियोजन करीत लातूरच्या नम्रता रामराव धाकपडे या मुलीने १२ वी परीक्षेत ९३.५० टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे कुठलाही खासगी शिकवणी वर्ग नसताना आई–वडिलांच्या अपेक्षा पुर्ण करणाऱ्या नम्रताचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# समान नागरी कायदा आणणार...

(पान १ वरून) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खुल्या प्रवर्गातील गरिबांना मिळणाऱ्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून काँग्रेसला लक्ष्य केले. ब्राह्मण, बनिया (वाणी) समाजात देखील गरीब आहेत. गरीब सवर्णांना आरक्षण मिळू नये का? काँग्रेसने याकडे कधीच लक्ष दिले नाही. परंतु आपल्या सरकारने १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण दिले. काँग्रेसला मात्र ओबीसींचे आरक्षण संपवून मुस्लिमांना आरक्षण द्यायचे आहे. कर्नाटकात काँग्रेसने हेच केले. आता इंडिया आघाडीला हेच संपूर्ण देशात करायचे आहे. मात्र आम्ही दलित, आदिवासी, ओबीसींचे आरक्षण हिरावू देणार नाही, असे मोदी म्हणाले.

यावेळी त्यांनी पाकिस्तानचा उल्लेख करत काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसच्या नेतृत्वात देशात कमकुवत सरकार असताना पाकिस्तान आपल्या देशात दहशतवादी हल्ले करायचा आणि आपण जगभर विनवण्या करत फिरायचो. परंतु आता भारत जगापुढे हात पसरत नाही. भारत स्वतःची लढाई स्वतः लढतो आणि वेळप्रसंगी घरात घुसून मारतो, असे मोदी म्हणाले. पूर्वजांच्या नावावर जगणारे देश घडवू शकत नाहीत. आकाशात उपग्रह पाठवणारे युवा शास्त्रज्ञ, स्टार्टअप सुरू करणारे तरुण, लढाऊ विमान उडवणाऱ्या मुली, शेतात ड्रोन उडवणाऱ्या गृहिणी हे देशाचे भविष्य आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना सरकार चालवण्यासाठी तिहार तुरुंगात कैद असलेल्या आपल्या मालकाकडे जावे लागते, असा टोला यावेळी त्यांनी लगावला. काँग्रेसने शीख विरोधी दंगलीतील आरोपींना वाचवल्याचा आरोपही त्यांनी केला. हिमाचल प्रदेशात काँग्रेसचे ’टाळेबाज’ सरकार आहे आणि हा पक्ष अयोध्येतील राम मंदिराला देखील टाळे ठोकण्याचे मनसुबे आखत आहे, अशी टीका मोदींनी केली.

# अमेरिकेत शिक्षण क्षेत्रात बीडच्या सुपुत्राचा डंका...

(पान १ वरून) ठरतं असे म्हणावे लागेल. परळी तालुक्यातलं दादाहरी वडगाव कुठे आणि त्या गावचा फुलचंदनं अमेरिकेच्या प्रगत देशात वाजवलेला डंका कुठे?कल्पना करू शकत नाहीत मात्र गुणवत्ता ही खर्या अर्थाने आकाशातुन तळपणार्या विजेसारखी कुठल्याही अंधारात प्रकाश देवुन जाते हे नक्की. दत्तात्रय गुट्टे हे इंटक संघटनेचे वीज कामगार नेते म्हणुन ओळखले जातात. त्यांचा मुलगा फुलचंद याने २०१६ मध्ये जीआरईई परीक्षेत प्रथम मार्क घेवुन अमेरिकेतील साऊथ फुलोरिडा विद्यापीठात इलेक्ट्रिकल्स विषयात प्रवेश घेवुन एम.एस.पदवी पुर्ण केली. आपल्या पदवी प्रदान समारंभाला माता–पित्यांनी उपस्थित रहावे अशी त्याची इच्छा होती. मात्र आजोबाच्या दुर्दैवी निधनामुळे आई–वडिलांना जाता आले नाही. मात्र फुलचंदच्या मनात एक शल्य आई–वडिलांना पदवी प्रदान कार्यक्रमाला घेवुन यायचे बोचत होते. त्यांची इच्छा पुर्ण करण्यासाठी जिद्दीने त्याने तिथेच नोकरीला सुरूवात केली. हरिशबर्ग विद्यापीठात व्यक्तीगत प्रकल्प व्यवस्थापन (project management )विषयात पुन्हा एम. एस.मास्टर पदवी मिळवली. पदवीचा डबल धमाका गाजवताना पदवी प्रदान समारंभाला आई–वडिलांना बोलावले. एखाद्या मुलाच्या अंगात जिद्द असेल तर केवळ शिक्षणच नव्हे तर सर्व क्षेत्रात कशी गरूडझेप घेवु शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे फुलचंद होय. विद्यार्थी दशेत त्याने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थे अंतर्गत परळीत चालणार्या भेल सेकंडरी स्कुल शाळेत शिक्षण घेतल्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण लातुरच्या राजर्षी शाहु महाविद्यालयात घेतले. अभियांत्रिकीचे शिक्षण पुण्यात पुर्ण केले. तदनंतर उच्च शिक्षणासाठी तो अमेरिकेत गेला होता. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता सर करण्यासाठी घेतलेले कठोर परिश्रम आणि आई–वडिल व गुरूजनांचे आशिर्वाद यामुळे मला सतत यश मिळाल्याची प्रतिक्रिया त्याने दिली.


भविष्यात आपण मिळवलेल्या ज्ञानाचा उपयुक्त वापर देशासाठी करता येईल का? हा विचार करणार असल्याचे त्याने सांगितले. फुलचंद याच्या यशाबद्दल बालासाहेब गित्ते, राम कुलकर्णी, संजय आघाव, मारोतराव फड, श्रीहारी मुंडे, उपप्राचार्य बिभीषण फड, आर.डी.मुंडे, रमाकांत बापु मुंडे, माधवराव दहिफळे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

# विषमतेच्या अस्वस्थ वेदनांचा छेद असं हे सगळं...

चाकूर तालुक्यातील महाळंगी ही तशी, पाटलांच गाव म्हणून पूर्व परिचीत होतीच. मात्र तिला अक्षरलेन प्राप्त झाले नव्हते. महाळंगीला वाङ्मयीन वैभव वेशीबाहेरच्या गावकुसातील प्रा. रामकिशन समुखराव व प्रा. आत्माराम गोडबोले या वंचित घटकांतील उपेक्षित विद्यार्थ्यांनी प्राप्त करून दिल. याचे सर्व श्रेय आपल्या लोकशाही आणि संविधानाला जाते. ज्यांना ज्ञान हक्क नाकारला. आणि ज्यांना वर्गाबाहेर बसून शिक्षण घ्यावे लागले. त्यांचीच आता अक्षर– पुस्तकांशी अशी इतकी गट्ठी झालेली आहे. हे परिवर्तन अनुकरणीय व स्वागतार्ह आहे. स्वातंत्र्यातील ही ओळख निश्चितच उत्साहवर्धक आहे. आणि या अशा उर्जेच अप्रूप पण आहे. प्रा. रामकिशन समुखराव यांनी, असं हे सगळं... आपल आत्मकथन लिहल आहे. हे १७६ पृष्ठांचे असून, ते लातूर येथील अरुणा प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. हे एकूण १९ कथामध्ये सामावलेल आहे. प्राचार्य डॉ. माधव गादेकर यांची प्रस्तावणा आहे. तर प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांनी अभिप्राय दिला आहे. आणि प्रा. डॉ. भगवान वाघमारे यांनी यास मलपृष्ठ टिप्पणी दिलेली आहे. लेखकानी हे आपल पहिल– वहिल ग्रंथपुष्प आपल्या माईसह, पत्नी व दोघां सालगडी भावांना समर्पण केले आहे. या आत्मकथेच मुखपृष्ठ लक्षवेधक आहे. निघालेल्या सूर्याजवळून पक्षी अथांग आकाशात झेपावून भरारी घेत आहे. भिंतीवरील काळ्या फळ्यावर, ' विद्यार्थ्यांनो जागृत व्हा !' हा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मत–संदेश लिहिलेला आहे. हाती खडू– पुस्तक घेऊन, कथाकर्ते गुरुजी त्याच फळ्यासमोर आनंदाने उभे आहेत. आणि खाली कोप–यात आत्मकथा शिर्षकाच्यावरती, अत्यंत जुनाट असा एक तीन चाकी लोखंडी सायकल रिक्षा आहे. अश्चर्य व वेदना दर्शवत, तो स्वतःहाच एक अभिमानी प्रतिक बनून वाचकांच्या मनात, सहानुभूतीने अगदी अखेर पर्यंत पुस्तकभर रेंगाळत राहतो.

असं हे सगळं... च्या मनोगतामध्ये, प्रा. समुखराव हे म्हणतात की, बलुतं, आठवणीचे पक्षी, उपरा अशी मी अनेक आत्मचरित्र वाचली होती. त्यामुळे मला मागील कांही वर्षापासून वाटत होते की, आपणही आत्मचरित्र लिहावे. जीवनाच्या वाटेवर चालत असताना, काटेच काटे आले पण ते काटे तुडवित असताना, त्याची फुले केव्हा झाली ? हे कळलच नाही. किनवटसारख्या अति दुर्गम भागातून, शिक्षक सेवेतून निवृत्त झालो. आणि पाहता–पाहता अक्षरं उतरत गेली आणि हे आत्मकथन साकारल. हा लेखक प्रांजळ आहे. उसनवारी करत नाही. स्वपदरी अत्यंत रांगडे जीवनानुभव आहेत. ते सहज व निःसंकोच निडरपणे मांडतो. आणि आपल्या अंतरिक तळमळीच्या उधानाला, खळखता पाठ रिक्त करून देतो. हा लेखक स्वतःशी व जगण्याशी सुद्धा खूप प्रामाणिक आहे. आणि एक लेखक म्हणून, ही चांगलीच जमेची बाजू असावी. या आत्मकथेची दुसरी एक महत्वाची बाब अशी की, अगदी ' प्रश्नातूनच ' या आत्मनिवेदनाची निर्मिती झालेली आहे. आणि असे स्वचिंतन हे, चांगल्या वैचारिक आरोग्याचे एक लक्षण मानावयास हवे असते. प्रश्न ही जसी शोध जननी आहे. तसे ते जीवंतपणाची साक्षपण आहे. प्रश्न जेव्हा डोक्यात प्रवेश करतात, तेव्हा ती एक स्वतःशीच संवाद वा आत्मचिंतनाची प्रक्रिया असते. चित्त बेचैन करते. आणि मग अपेक्षित उत्तरासाठी, ज्या– त्या लेखकाचा सनातन व्यवस्थेविरुद्ध सुप्त संघर्ष सुरु होतो. तव्दतच येथे बेमालुमपणे माणूस व त्याचे माणूसपण नाकारल्याचा असंतोष पाना–पानावर खदखदतो. आणि त्यातून हे असे मलाच का ? आणि कशासाठी ? म्हणत, 'जात' व 'धर्म' यातील पाखंड व स्वार्थी फोलतेचा समाचार घेत राहतो.

या आत्मचरित्रातील, ' गाव तसं चांगलं ' ही पहिली कथा आहे. गावच्या पूर्वे ला एक छोटीशी नदी. पलिकडच्या काठावर मसनवाटा. अलीकडच्या बाजूला मांगा– महारांची घर. संध्याकाळी एखाद प्रेत जळू लागल की, थेट लेखकांच्या घरात त्याचा उजेड पड़त असे. गावाच्या दक्षिणेला टुमदार महादेवाचे एक जुनं मंदिर. गावाबाहेर गेलेली सर्व लोक व अन्य पाहुणे या जत्रला आवर्जून यायची. येथील माधवराव पाटील आणि तात्यासाहेब पाटील या बंधुचे फार मोठे प्रस्थ. थोरले पाटील दयाळू व सर्व गावावर मेहरनजर ठेवनारे होते. तर धाकटे पाटील पैलवान होते. महाळंगीचे हे बंधू त्या पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. हे पाटील रस्त्याने निघाले की, रस्त्याच्या कडेला बसलेली माणसं पटापट उठून उभे राहायचे. या पाटलाच्या समोरून एक ही बाई जाता कामा नये, असा येथील एक अलिखित रिवाज होता. या पाटलांची कचेरी सतत १०–१५ माणसांनी भरून राही. तर गावच्या मध्यभागी वसलेला, या पाटलांचा ७ दरवाजी वाडा अगदी किल्लयासारखा होता. तात्यासाहेबांना पशू–पक्षी पाळण्याचा विशेष छंद होता. दुर गावो–गावचे लोक हे पशुसंग्राहलय पाहण्यासाठी आवर्जून येत असत. यांची कचेरी म्हणजे त्या काळी जणू तंटामुक्तीच एक केंद्रच. मांगा– महारांची माणसं या कचेरीच्या बाहेर बसायची. स्पृश्या–स्पृश्यता भयानक होती. तसे पाहता इतर हे सर्वच दलित. पण जातीयतेचे ज्यास्त चटके फक्त आणि फक्त मांगा – महारांनीच सोसलेत. इतरांना त्याचा काही अनुभव नाही. स्पृश्य उच्चवर्णीय मग तो कोणत्याही जातीच असो. आमचा त्यांना बाट होत होता. माझा बाप हा त्यांच्या बापापेक्षा वयस्कर. तरी ते बापाला एकरी नावाने अरे–तुरे बोलायचे. त्यामुळे बाल अवस्थेत



असलेल्या या लेखकाच्या मनाला पहिलाच प्रश्न पडला की, आपण त्यांच्या आई– वडिलांना, आवं – जावं बोलतो. मग ते आम्हाला असे अरे–तुरे का बोलतात ? त्यांच्या घर–दार व गोठ्याच्या दारांवर आंब्याच्याच पानाचे तोरण आपणच का बांधायचे ? दिवाळीला कुणबी जेवायला बोलवाचे खरे. मात्र ते गुराढोराप्रमाणे टोपल्यातच वाढायचे. चहासाठी वेगळे कप ठेवलेले. नाही तर, लोखंडी चिपट्या – मापट्यात चहा द्यायचे. विहिरी आम्ही खोदायच्या बांधायच्या, पण त्या विहिरीचे पाणी आम्ही प्यायचे नाही. मंदिर आम्ही बांधायची, पण त्याच मंदिरात आम्हाला प्रवेश नाही. गावच्या मंदिर गाभा–यात कुत्रे जायचे. ते चालायचे. आपला जन्म या जातीत का झाला असावा ? असे त्याना वाटे. दरम्यान लेखक दहावीला आले. त्यांना कळू लागले. त्यांनी सांगितले यापुढे तोरण बांधने बंद करा. गरज नाही त्या दुरुन टाकलेल्या एका पोळीची. आपण उपाशी राहू. त्यावर वडील म्हणाले की, ' अरे बाबा, हा रितीरिवाज आहे. त्याप्रमाणे वागाव लागत. लेखक म्हणतो, तुमचे देव तुम्हाला लकलाभ. त्या डॉ. बाबासाहेबांचे उपकार या जन्मी तरी फिटणार नाहीत. तेच आमचे देव. तेच आमच सर्वस्व. महारांनी देव पोत्यात भरून नदीत टाकून दिले. आणि मांगांनी ते सर्व देव घरात आणून बसविले. खरच देव असता तर, महारांचं वाटोळं झाल असत. अन् मांगांचे बंगल्यावर बंगले चढले असते. पण उलट झाल. बाबासाहेबांना जो स्वीकारील त्याची च प्रगती होईल आणि त्यांना जो नाकारील त्याची मातीच होईल ! असा निष्कर्ष सुद्धा समुखराव यांनी नोंदवून टाकला. त्यापूर्वी लेखकांनी असे गंभीर ९ प्रश्न उपस्थित करून, जातीय अन्याय व शोषणाचे विदारक स्व तपशील दिले आहेत. ११:३५ रा, २५/५/२०२४ ड्ढशीझहरपश ड्ळी: ' सुकडी ' या कथेमध्ये लेखकांनी १९७२ च्या भीषण दुष्काळाची दाहक आठवण करून दिली आहे. सुकडीवर कसे दिवस गुजरले ? आणि त्याच्या शि–यावर गरीबांच्या मुला – मुलींची लग्नेही उरकल्याचे सांगितले आहे. या प्रकरणात लेखकांनी जनावरांची पण काय हालत झाली. माणसानाही बरबडा खावा लागला. बायांना आटवाभर ज्वारी अन् पुरुषांना शेरभर ज्वारी, ते पण नकट्या शेराने रोजगार मिळत असल्याचे नोंदले आहे. पुरुषांच्या थोराड भूकेपुढे घरातली भाकरीही, प्रसंगी माय–माऊल्यांना नाविलाजाने चोरावी लागल्याची, एक भयंकर आठवण समुखरावांनी नोंदली आहे. लेखकांनी घरांच्या भिंतीवर सूर्याच्या उन – सावलीची खूण करून, त्यास आपल्या शाळा वेळेचे घड्याळ बनविले. लेखकांच्या सात पिढ्यात कोणी शिकलेले नव्हते. परिस्थिती



पुस्तक–परिचय
**रामकुमार रायवाडीकर**
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा
मुक्त–पत्रकार, लातूर.
मोबा.९८९०४४४५२१

अत्यंत खडतर. तरीही भूजाजीनी, या आपल्या रामकिशनला मोठ्या हौसेने शाळेत घातले. तर कांही जमीनदार पाटलं लगेच घरी आले. आणि या पोराला आमच्या गुरांवर पाठव. दोन वेळच जेवण. अन् दहा रुपये महिन्याला देतो. तुझ पोरग काही वकील– डॉक्टर होणार नाही असे म्हणाले. यावर लेखक पिता उद्गारले की, मालक बाकीच लेकरं शिकवली नाहीत. एवढ तरी जाऊद्या की शाळत. चार वर्ग शिकला, तर पत्र तरी वाचायला येइल. समुखराव म्हणतात, मेंदूच्या शेतात पिकत नाही, असा एकही पदार्थ या जगात नाही. बाज्यामध्ये लग्नात वडील एक – एक तास सूर छान वाजवायचे. पण ते लोक मात्र उकीरड्यावरच वाजंत्र्यांना जेवण्यास बसवायचे.' माझे गरुजी ' मध्ये लेखकांनी आपल्या प्राथमिकच्या ६ व्या वर्गातील कांही आठवणी सांगीतल्या आहेत. विज्ञान विषयाचे वर्ग शिक्षक सुर्यवंशी गुरुजी, बीजगणीताचे खेंदाड गुरुजी, इतिहासाचे बोंदर गुरुजी यांच्या त्या आठवणीही आहेत. खेंदाडांच्या तासात पोर चड्डीत लघवी करून घ्यायचे. तर त्यांच्या माराने अनेकांनी शाळा सोडल्या. पुढे ते मोल – मजूर व गुराखी झाले. वर्गात इत्तर मुले लेखकाला ये मांगड्या म्हणायचे. पुढे सातवीत लेखकाना थोड कळू लागल. अन्यायाची जाणीव होऊ लागली. सातवीची परीक्षा या प्रकरणात तरी, समुखराव वाचले जाऊ शकत नाहीत. प्रथमतः बोर्ड परिक्षेसाठी म्हणून ते बाहेरगावी चालत जानवळला येतात. परीक्षेतील पोटभूक, उपासमार, आई – वडीलांचे कष्ट आणि निवास ठिकाणी इत्तरांपासून यांना वेगळे ठेवणे. तरीहा सदर बोर्ड परीक्षा लेखक पास झाले. पुढे आठव्या वर्गासाठी एक पत्री संदूक घेऊन, समुखराव आठ कि.मी. अंतर पायी चालून, रेल्वेने परळीला एका वसतीगृहात जातात. तेथे पण भुकेने पाठ सोडली नाही. पोटभर व वेळेवर जेवन मिळत नसे. तसेच अभ्यासाऐवजी त्यांच्या शेतीवरील काम करून घेत आणि अफाट मारहाण चकरत असत. सतत जेवन बंदची शिक्षा. तेव्हा लेखक व त्यांचे इत्तर मित्र, नदीला जाऊन मासे व खेकडे धरून, तेथेच भाजून खाऊन येत असत. भूकेसह वह्या– पुस्तक व प्रवास टिकीटाच्या पैशासाठी, लेखकांना अखेर चोरीही करावी लागली. पोटभर जेवनासाठी लेखकांला वसतीगृहातील अन्य विद्यार्थ्यांना सोबत घेऊन, पोलिस ठाण्यावर भूक मोर्चा काढावा लागला. अशाही परिस्थितीत गावभर हाळी झाली की, ' भूजा मांगाचं पोरगं मॅट्रिकला पास झाल ! '

'जिवाची मुंबई','गुजरात' मध्ये पण अतिशय बेहाल. ' बंदिस्त मी ' मध्ये लेखकाचे वयाच्या १७ व्या वर्षीच, अंबाजोगाईच्या १३ वर्षाच्या मुली सोबत, पुढील शिक्षणाची व खाण्या–पिण्याची सोय होईल म्हणून लग्न करून दिले. लातूर अंबाजोगाई असे खूपच वाईट हालतीमध्ये, समुखरावानी एम. ए. बी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. या दरम्यान त्यांनी गावी नालाबंडिंग खोदण्यापासून, विहिरी, तळे खोदणे, खुरपणे, ऊसथळ, डाळमिल, ऑईलमील, थर्मल ते लातुर येथे रात्रपाळीत तीन चाकी सायकल रिक्षा चालवून, ते दिवस निभाऊन नेले. या पूर्ण काळात पत्नी सौ. शशिकलाताई यांची फारच ओडाताण झाली. मात्र अखेर पर्यंत त्यांनी आपल्या पतीस, मजूरी व आडत दुकानी कष्ट उपसून हिमतीने अत्यंत मौलिक साथ दिली. शिक्षण व रोजगारासाठी लेखकांना खूपच भटकंती करावी लागली. त्यात राहणे – खाणे व शिक्षण साहित्य आणि अन्य खर्चाची अतोनात बंडाळ. शेवटी कसलिही देणगी न देता, दि.१९/६/१९९० मध्ये सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालयात, प्रारंभी दरमहा आठशे रुपयावर, त्यांना कनिष्ठ प्राध्यापकाची सेवा प्राप्त झाली. ' कलाटणी ', ' गु–हाळाचे काम ', ' माझ्यातील ती ', ' सासरवाडी ', ' सायकलरिक्षा ', ' एम. ए.', ' लाचारी ', ' गुजरातमधील अडीच महिने ', ' नोकरी ', ' किनवटचे दिवस ', ' सामाजिक नाळ ', अशी काही यात प्रकरणं आहेत. लेखकांचा स्वभाव जाणीवेचा व धडपड्या असल्याने, त्यांनी फार मोठा संघर्ष करीत, काम व अनुभवाची व्याप्ती अखेरपर्यंत वाढती ठेवली. या आत्मकथनाची भाषा ग्रामीण असून, बोली भाषेतील शब्दांचा अधिक वापर आहे. प्रा. समुखराव यांचे उत्तम निरीक्षण असून, चौफेर चौकस – चोखंदळता पण आहे. यातील निसर्ग वर्णन आणि भाषा सौंदर्य हे, कसदार लेखकाची आठवण करून देते. त्यांच्या विचाराला वाव न देणारी कोंडी सतत पारिस्थितीने लादली. त्यांचे जीवन म्हणजे भूक, दारिद्र्य आणि संकटांनी डबडबलेल हे एक वेदनेच गाव आहे. लेखकांनी स्वतःतील न्यूनगंड हद्दपार केला. पण सावध संकोच्याचा थोडासा वावर राहिलेला जाणवतो. यात परिस्थिती, रूढी व पडिक मानसिकतेची एक सूप्त खदखद आहे. त्यास भूमिकेची जोड अपेक्षित असते. अशा आत्मचरित्रांनी येथील अंधश्रध व शोषण करणा–या व्यवस्थेला आव्हान दिले हे सत्य. पण प्रतिक्रांतीसमोरच्या टिकावावर त्याचे मुल्यमापन अवलंबून असेल. लेखक एका ठिकाणी म्हणतात, माझी दोन मुले सरकारी चांगल्या नोकरीत आहेत. माझ्याकडे आज अगदी सर्व काही आहे. ते मी माझ्या केवळ जिद्दीने, कष्टाने आणि आत्मविश्वासाने मिळावले आहे. मला वाटते या आत्मकथनात भूक आणि समस्येच भयानक मिश्रण आहे. समाजाच्या सर्व स्तरातील विद्यार्थी व पालकांनी, प्रा. रामकिशन समुखराव यांचे ' असं हे सगळं ' आत्मचरित्र आवश्य वाचावे. हे केवळ आत्मचरित्र नाही तर, यशस्वी अशी एक संघर्ष गाथा असून, ती बहुदा कोणत्याही समीक्षेत वा कुठल्याही पुरस्कारात न सामावणारी आहे. त्यामुळे आता प्रा. रामकिशन समुखराव या लेखकांकडून कांही अपेक्षा वाढल्या आहेत. या त्यांच्या मूळ आत्मचरित्रामध्ये, आणखी एक महा क्रांतिकारी ' चरित्र ' दडले आहे. त्याचा त्यांनी जरूर शोध घ्यावा. आणि त्या शशिकला चरित्रास, एक लेखक म्हणून, स्वतंत्रपणे असाच योग्य तो न्याय द्यावा. आणि दलित आत्मकथन व दलित स्त्री आत्मकथनाच येथील पूर्व दालन आपण अधिक समृद्ध कराव. **('असं हे सगळं '... (आत्मचारित्र ) प्रा. रामकिशन समुखराव, अरुणा प्रकाशन, लातूर. पृष्ठं १७६, मूल्य १८० रुपये.)**

# डी.एम.ज्युनिअर कॉलेजचे १२ वी बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश

लातूर : अवंती नगर, लातूर मधील डी.एम. ज्युनिअर कॉलेज लातूर चा महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल १००% लागला असून दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी कॉलेज ची यशाची परंपरा कायम राहिली आहे.

कॉलेज मधील विज्ञान शाखेच निकाल १००% लागला असून विज्ञान शाखेतून सर्वप्रथम राजुळे स्वयम (८५%) द्वितीय शेख तुबतज्ञिन (८१%) तर तृतीय कोव्हाळे गौरव (७७%) तर वाणिज्य शाखेचा ९०% निकाल लागला असून वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम भोसले संतोष (८०%), द्वितीय दरेकर साक्षी (७६%), तृतीय सुनके नेहा (७२%) व कला शाखेचा निकाल ७५% लागला असून कला शाखेतून सर्वप्रथम वाकळे प्रगती (६४%), द्वितीय साळुंके पूनम (६१%), आणि आरेराव सुनाक्षी (५८%) व करदुरे प्रिती (५८%) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

कॉलेज मधील सर्व यशस्वी व गुणवंत विध्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्था सचिव श्री कालिदासजी माने, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मनोज भैय्या माने, प्रशासकीय अधिकारी श्री जी. टी. माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्या श्री विवेक भैय्या माने, साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व डी. एम. कॉलेजचे प्राचार्य श्री चव्हाण एस.एस. यांनी केले तसेच कॉलेज मधील सर्व प्राध्यापक श्रीमती सूर्यवंशी ए.डी. श्रीमती थोरात व्ही. एस. श्री कांबळे एस.व्ही., श्री बुरशे बी.एस., श्रीमती भोसले व्ही.ए., श्री माळी बी. के., श्रीमती बोधणे एस.बी., श्रीमती शेख एस.ए., श्रीमती माने एस.बी., श्री बामणकर पी.सी., आणि शिक्षकेत्तर कर्मचारी श्री पवार डी. के. श्री जाधव एस.एम., श्री जाधव डी.जे., श्री पांचाळ दिग्विजय, श्री सुडे आर.पी., श्री हेडे ए.एस. यांनी ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आधुनिक काळात तथागत गौतम बुद्धाचेच विचार आणि कार्य जगाला तारु शकतात–गुणवंत मिसलवाड



नांदेड – आजच्या या आधुनिक काळात सध्याची परिस्थिती पाहता या देशाला व जगाला महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांचेच विचार आणि कार्य तारु शकतात असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. २३ मे २०२४ गुरुवार रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ वी जयंती आगाराच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती सोहळा अभिवादन कार्यक्रमात ते प्रास्ताविक करताना बोलत होते.

प्रमुख वक्ते म्हणून 'बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भगवान गौतम बुद्धांनी माणसाला प्रज्ञा– शिल– करुणा आणि प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, शांतता प्रस्थापित करण्याचे विचार आणि कार्य त्यांनी या तमाम जगातील मानवजातीला दिले आहेत, अशा या महान कारुणिकाचा आदर्श आपण सर्वांनीच घेऊन सामाजिक व राष्ट्रीय कार्य करण्याची आज काळाची नितांत गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले. सर्वप्रथम विभाग नियंत्रक मा. श्री. चंद्रकांत वडजकर यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची पूजाअर्चना करुन पुष्प अर्पण करण्यात आले. तद्नंतर चालक उपा. बाबासाहेब चिंतोरे यांनी त्रिशरण, पंचशील वंदना सामूहिकरित्या घेतली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विभाग नियंत्रक मा. श्री. चंद्रकांत वडजकर, आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, वाहतुक निरीक्षक ओमप्रकाश इंगोले, वाहतुक नियंत्रक अर्चना पवार, राजेश कांबळे, कामगार नेते रघुनाथराव वाघमारे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, विजयकुमार आढाव, सुनील मोरे, अनिल आत्रे, वंदना डोणेराव, आम्रपाली जमदाडे, प्रमोद लोखंडे, सुभाष लांडगे, मल्हारी वाघमारे, आशिलेष सोनकांबळे, यशोदीप आटकोरे, बाबासाहेब चिंतोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर लगेचच खिरदान वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास आगारातील कामगार कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर शहरात बुद्ध जयंती सोहळा उत्साहात संपन्न

लातूर : शांतीचे अग्रदुत, महाकारूणीक, विश्ववंदनीय तथागत गौतम बुध्दांचा जन्म वैशाख पौर्णिमेला इ.स. पूर्व ५६३ मध्ये झाला. शील, सदाचार, करूणा, मैत्री आणि शांततेची शिकवण हे भगवान बुध्दांचे व्यावहारिक व आध्यात्मिक तत्वज्ञान असुन समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय तथागत बुध्दांचा समग्र जगाला वैश्विक संदेश आहे. भगवान बुध्द संपूर्ण आशिया खंडाचे दिपस्तंभ (डळसहीं ष –ीळर)च ठरले आहेत. समाजास बुध्दीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी आणि सुसंस्कारी बनवने हे बुध्द शिकवणीचे ध्येय आहे. अशा या भारताच्या महत्तम युगप्रवर्तक महामानव ठरलेल्या तथागत भगवान बुध्दांची जयंती आज जगभरात मोठ्या उत्साहात साजरी होतांना लातूर शहरातही मोठया उत्साहात पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या सौजन्याने तथागत बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस भंते बुद्धशील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पंचशील धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धम्मसंदेश रॅली काढण्यात आली. या वेळी हजारोच्या संख्येने बौद्ध उपासक, उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. या धम्मसंदेश रॅलीमध्ये समता सैनिक दलाचीही परेड झाली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अपर्ण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. त्रिशरण पंचशीलानंतर शुभेच्छापर बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो यांनी सर्व भारतीयांना बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व धम्मसंदेश रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी केशव कांबळे, विनोद खटके, भिमराव चौदंते, सुजाता अजनीकर, प्रा. देवदत्त सावंत, सुशील चिकटे, कुमार सोनकांबळे, जि.एस. साबळे, शोभा सोनकांबळे, वसंत वाघमारे, पांडुरंग अंबुलगेकर, साधू गायकवाड, लाला सुरवसे आदीसह मोठया संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे जितेंद्र बनसोडे, असित कांबळे, रमक जोगदंड, आनंद सोनवणे, राहुल डुमने, विजय चौधरी, सिद्धार्थ सूर्यवंशी, करन ओव्हाळ, विनोद कोल्हे, राजू सूर्यवंशी, राहुल शाक्यमुनी, अशोक कांबळे, ज्योतीराम लामतुरे, अनिरुद्ध बनसोडे, अरुण कांबळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, उदय सोनवणे, मिलिंद धावारे यांनी परिश्रम घेतले.

# तीर्थवाडी येथे खरीप हंगाम पूर्व बैठक संपन्न

## रुंद सरी वरंबा(BBF)पिकाची लागवड करणे फायदेशीर

चाकूर(प्रतिनिधी): मौजे तिर्थवाडी ता.चाकुर येथे खरीप हंगाम पूर्व बैठक आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून श्री.चामले (कृ.स.चाकुर), यांची उपस्थित होते. सदरील बैठकीमध्ये खरिप हंगाम पुर्व तयारी च्या अनुषंगाने प्रास्ताविक गावचे उपसरपंच राजकुमार शेटे साहेब यांनी केले.

सोयाबीन लागवड तंत्रज्ञान (बियाणे उगवण क्षमता तपासणी,बिजप्रक्रिया, बीबीएफ व टोकण पद्धतीने लागवड, योग्य वाण निवड,खत व्यवस्थापन, एकात्मिक किड व रोग नियंत्रण,शंखी गोगलगाय व्यवस्थापन )व तुर पिकातील मर रोग व्यवस्थापन इ. बाबत मार्गदर्शन श्री. चामले कृषी सहाय्यक यांनी केल. सुदर्शन बोराडे तंत्रज्ञान समन्वय पोखरा यांनी रुंद सरी बरंबा पद्धत व शुन्य मशागत तंत्रज्ञाना संदर्भात मार्गदर्शन केले . व सर्व शेतकऱ्यांना यावर्षी रुंद सरी वरंबा पद्धत( बेड)वरती सोयाबीन



या पिकाची लागवड करावी असे आवाहन केले. मनोज बिराजदर व महाडीबीटी पोर्टल वर बियाण्या करीता ऑनलाईन अर्ज करणे,वैयक्तिक शेततळे,फळबाग, कांदाचाळ व शेडनेट आणि महाडीबीटी वरील अनु.जाती व अनु. जमाती या संवर्गातील शेतकऱ्यांचे अर्जसंख्या वाढविणे यासंदर्भात मनोज बिराजदर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन कले.या कार्यक्रमास गावातील उप सरपंच राजकुमार शेटे व कृषी मित्र रामेश्वर पताले व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाविद्यालय शैक्षणिक विकासात संस्था पदाधिकारी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान महत्त्वाचे

## नवनिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर

लातूर : सध्या आपल्या देशात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची नियोजन प्रक्रिया पूर्ण झाली असून त्याची अंमलबजावणीची प्रक्रिया जलदगतीने सुरू आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासात संस्था पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यासोबत विद्यार्थी आणि पालकांचे सक्रिय योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी होईल असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे नवनिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वार्षिक नियोजना संबधी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख आणि कार्यालयीन कर्मचारी यांची विचार विनिमय बैठक प्राचार्य कक्षामध्ये संपन्न झाली. या बैठकीचा अध्यक्षीय समारोप करताना ते मार्गदर्शन



करीत होते. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, वरिष्ठ महाविद्यालय कला शाखा समन्वयक डॉ. बाळासाहेब गोडबोले, विज्ञान आणि संगणकशास्त्र शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे, वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखा समन्वयक प्रा. वनिता पाटील, प्रा. नितीन वाणी, कला शाखा समन्वयक प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. टि. घनश्याम, प्रा. व्यंकट दुडिले आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ शैक्षणिक वार्षिक नियोजन करणे, शैक्षणिक शुल्क निश्चित शैक्षणिक वार्षिक शुल्क ठरविणे व इतर विविध विकासात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित केल्याचे सांगितले. पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांच्या विचाराने आणि देशीकेंद्र महाराज यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल, समाजकार्य आणि संगणकशास्त्र या अभ्यासक्रमातून कौशल्ययुक्त विद्यार्थी निर्माण करण्यासाठी आपण सातत्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील नवनवीन अभ्यासक्रमाची आपण सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी संस्थेकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल, असे सांगून सर्व शाखामधील अनुदानित, विनाअनुदानित तुकड्यांची मान्य संख्या ही पूर्ण क्षमतेने आपण सर्वांच्या सहकार्याने पूर्ण करावी असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर म्हणाले की, शाखा समन्वयक व विभागप्रमुखांनी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आपल्या विभागाचा शैक्षणिक वार्षिक आराखडा तयार करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे तेव्हाच आपल्याला शैक्षणिक विकास साध्य करता येईल असे ते म्हणाले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासासाठी प्रशासकीय समिती प्रमुख, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित सर्वांनी विविध विषयाची मांडणी करून लवकरच आपापल्या विभागाचे २०२४-२५चे वार्षिक नियोजन प्राचार्याकडे सादर केले जाईल असे सांगितले. या बैठकीचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी रत्नेश्वर स्वामी, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, राम पाटील, संतोष येंचेवाड, राजाभाऊ बोडके, संदीप मोरे, श्रीशैल्य पाटील, बालाजी डावकरे यांनी सहकार्य केले.

# लाचखोर हरिभाऊ खाडेला २९ मे पर्यंत पोलीस कोठडी

बीड : मल्टिस्टेटच्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी १ कोटी रुपयांची लाच मागणाऱ्या हरिभाऊ खाडे विरोधात जिजाऊ मल्टिस्टेटचे ठेवीदारांचा उग्र अवतार शुक्रवारी कोर्ट परिसरात दिसून आला. हरिभाऊ खाडेला कोर्टातून बाहेर आणते वेळी दाराजवळ लाचखोर हरिभाऊ खाडे मुर्दाबाद, खंडेच धिक्कार असो अशा घोषणा देत शिवीगाळ करत जोरदार घोषणादिल्या.

ठेविदार प्रचंड आक्रमक रित्या आपला संताप व्यक्त केला. दरम्यान, खाडेला न्यायालयाने २९ मेपर्यंत पोलिस



कोठडी सुनावली आहे. जिजाऊ मल्टिस्टेटच्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी एका बिल्डरकडून १ कोटी रुपयांची लाच हरिभाऊ खाडे याने १ कोटी लाचेची मागणी केली होती.या तपास प्रकरणी त्याचा सहायक फौजदार आर. बी.जाधवरसह खासगी इसम कुशल जैन याच्याविरोधात १५ मे रोजी गुन्हा दाखल झाला होता. मागणीतील १ कोटीपैकी पाच लाख रुपये घेताना जैनला ताब्यातही घेतले होते तर खाडे आणि जाधवर हे दोघेही फरार होते. दरम्यान हरिभाऊ खाडेच्या घरात झडती मध्ये रोख १ कोटी ८ लाखांची रोकड, किलोभर सोने आणि साडेपाच किलो चांदी आढळून आली होती, तर सहायक फौजदार आर. बी.जाधवरच्या घरातही सोने आणि चांदी सापडली होती . फरारी झालेल्या या दोघांच्या तपासासाठी एसीबीने पथकेही नियुक्त केली होती. इकडे तिकडे आठवडाभर धावपळ करून खाडे हा गुरुवारी एसीबीसमोर शरण आला होता तर जाधवर हा अजूनही फरार आहे. दरम्यान, खाडेला शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला २९ मेपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. न्यायालयातून बाहेर काढून एसीबी कार्यालयात वाहनातून नेत असताना काही उपस्थित ठेवीदारांनी पोलिसांसमक्ष जोरदार शिवीगाळही केली.

# ऑटोतून जाणाऱ्या शेतकऱ्यांचे ५० हजार रुपये काढून घेतले

लातूर(प्रतिनिधी): लातूर शहरात ऑटोमधून प्रवास करणा-या प्रवाशांना लुटण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. परवा लातूर शहरातील गांधी चौक ते मिनी मार्केट या अत्यंत रहदारी असलेल्या काही पावलाच्या रस्त्यावरून ऑटोत बसून जाणा-या शेतक-याच्या खिशातील ५० हजार रुपये काढून घेण्याचा प्रकार घडला आहे.





बब्रूवान नारायण कदम रा. धानोरा, ता. निलंगा हे शेतकरी लातूरच्या महात्मा गांधी चौकातून हॉटेल अश्वमेघ कडे जाण्यासाठी एका ऑटोत बसले. महात्मा गांधी चौकचा ऑटो पॉईंट ते मिनी मार्केट हा रस्ता काही फुटाचाच आहे. एवढ्यात ऑटोतील एका ४० ते ४२ वर्षे वयाच्या अंगात फिकट गुलाबी रंगाचा शर्ट घातलेल्या तोंडाला रुमाल बांधलेल्या व डोक्यावर टोपी घातलेल्या अनोळखी व्यक्तीने बब्रूवान कदम यांच्या बनीयनच्या खिशातील ५० हजार रुपये काढून घेतले. या प्रकरणी त्या शेतक-याच्या तक्रारीवरून अनोळखी चोरट्याच्या विरोधात गांधी चौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांना अभिवादन....

(पान १ वरून) जाधव, हणमंत पाटील बेटमोगरेकर, डॉ. शिवाजी काळगे, नांदेडचे वसंतराव चव्हाण, सर्जेराव मोरे, प्रमोद जाधव, जगदीश बावणे, विक्रांत गोजमगुंडे, अशोक गोविंदपूरकर, ॲड. व्यंकट बेद्रे, बसवराज पाटील, लक्ष्मणराव मोरे, नागराळकर, सचिन बंडापल्ले, पुनीत पाटील, धनंजय देशमुख, यशवंतराव पाटील, गणपतराव बाजुळगे, श्रीपतराव काकडे, दिलीप माने, पप्पू कुलकर्णी, संतोष सोमवंशी, ज्योती पवार, स्मिता खानापूरे, शिला पाटील, ॲड. समद पटेल, कल्याण पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, शिवाजीराव हूडे, ॲड. बी. व्ही. मोतीपवळे, प्रमोद जाधव, विजय देशमुख, विजयकुमार ढगे, एस. डी. बोखारे, संजीव देसाई, ए. आर. पवार, मोहन माने, अभय सांळुखे, डी. एन. केंद्रे, डॉ. अशोक पोद्दार, मोईज शेख, राजाभाऊ जाधव, गणेश देशमुख, महादेव मुळे, पप्पू देशमुख, मन्मथ किडे, लक्ष्मण कांबळे, पृथ्वीराज शिरसाट, व्यंकटेश पूरी, लालासाहेब देशमुख, प्रताप पाटील, गोविंद बोराडे, राजकुमार पाटील, मदन भिसे, अमर खानापूरे, सुपर्ण जगताप, राजकुमार जाधव, सुर्यकांत कातळे, अमर मोरे आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व पदाधिकाऱ्यांनी लोकनेत्यास अभिवादन केले.




## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून भिसे परिवाराचे सांत्वन



लातूर : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी सहकार कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर भिसे यांचे वडील स्व. चंद्रकांत रामराव भिसे यांचे नुकतेच निधन झाले. दि. २३/०५/२०२४ रोजी तांदुळजा येथिल भिसे यांच्या निवासस्थानी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी भिसे परिवारातील सदस्यांचे सांत्वन केले. स्व. चंद्रकांत भिसे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले ग्रीन लातूर वृक्ष टिमच्या कार्याचे कौतुक

लातूर : ग्रीन लातूर वृक्ष टीम व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमा निमित्ताने बीज गोळे किंवा सीड बॉल बनवण्याचा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी सौ. वर्षा घुगे ठाकूर मॅडम यांनी सक्रिय सहभाग नोंदवून बीजगोळे बनविले. आज गुरुवारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या रंगनाथ झालेल्या कार्यक्रमांमध्ये सर्वप्रथम बुद्ध पौर्णिमा निमित्त जिल्हाधिकारी सौ वर्षा घुगे ठाकूर यांच्या द्वारे भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व बुद्ध पौर्णिमा निमित्त बोधिवृक्ष म्हणजे पिंपळ वृक्षाचे रोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यावेळी नगरपालिका सहआयुक्त रामदासजी कोकरे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपप्राचार्य श्री जाधव सर, ग्रीन लातुर वृक्ष टीमचे सर्व सदस्य व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. या सर्वांनी मिळून चार हजार पेक्षा अधिक बीजगोळे किंवा सीड बॉल बनविले. या बीज गोळ्यामध्ये विशेष : ताने तुळशीच्या बिया, सब्जाच्या बिया पिंपळाच्या बिया होत्या. ग्रीन लातूर पेक्षा टीम द्वारे गेल्या वर्षीपासून तुळशीच्या रोपांचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. यामध्ये रक्षाबंधन निमित्ताने सहा हजार तुळशीच्या बियांच्या राख्या बनवण्यात आल्या होत्या, भेटतील त्या व्यक्तींना तुळशीच्या बियांचे पॅकेट वाटप करण्यात येत असतात, अंदाजे १५ ते २० हजार तुळशी बियांची पॅकेटे आज पर्यंत वाटप करण्यात आलेली आहेत. हाच उपक्रम पुढे घेऊन जात असताना तुळशी बियांचे सीडबॉल किंवा बीज गोळे आज बनवण्यात आले आहेत. यासोबतच काळी गुंजा, लाल गुंजा, पांढऱ्या गुंजा, पांगारा, पळस पापडी, आपटा, सब्जा, लाजवंती, काटे सराटा, बहावा, कडुलिंब अशा दुर्मिळ आयुर्वेदिक उपयोगाच्या वनस्पतींच्या बिया बीज गोळे बनवण्यासाठी वापरण्यात आल्या. हे बीज गोळे बनवण्यासाठी लाल माती, काळी माती, शेणखत, मुंगी पावडर यांचे योग्य मिश्रण करून बीज गोळे तयार करण्यात आले. जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांनी स्वतः बीज गोळे बनवून सदस्यांना व आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. लातूर जिल्ह्याचे हरित आच्छादन वाढवण्याकरिता ग्रीन लातूर वृक्ष टीमने मागील १८१९ दिवसांपासून अखंड अविरतपणे श्रमदान केले, प्रयत्न केले ते अत्यंत मोलाचे असून यामुळे लातूर जिल्ह्यामध्ये सर्वत्र हिरवळ दिसून येत आहे याबद्दल जिल्हाधिकारी मॅडम यांनी ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांचे कौतुक केलं.

तयार झालेली बीजगोळे ही आयुर्वेदिक औषधांच्या उपयोगाची असल्याने आयुर्वेदिकदृष्ट्या उपयोगाची असल्याने आणि याच्यामध्ये छोट्या छोट्या बिया असल्यामुळे त्यांची उगवण क्षमता ही जास्त आहे विशेषः ताने तुळशीच्या बियांची उगवण क्षमता ही खूप जास्त असते, कमी पावसात या बिया लवकर रुजतात, रोप उगवतात आणि परत याच्या मंजुळा आल्यानंतर एका झाडापासून शे-दोनशे बिया होऊन त्यांचा प्रसार होतो. वडवळ नागनाथ बेट, हत्ती बेटचं जंगल, येडशीच जंगल या ठिकाणी श्रावण महिन्यात ह्या बीजगोळ्यांचं रोपण करण्यात येणार आहे. आणि हे रोपण झाल्यानंतर त्यापासून निश्चितच काही प्रमाणात झाडं उगवतील असा विश्वास जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला.

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्र्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200